# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२६ / फाल्गुन १३, १९४७ ( शके )**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

(३) ते (६) – **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

**राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करुन त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्याबाबत**

**(१) * २६८९४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहिम सुरू केली असून त्यामुळे भूमी अभिलेख विभागाने पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोहिमेचा भाग म्हणून सात-बारा उताऱ्यावर पाणंद रस्त्यांची नोंद घेण्यास सुरूवात केली काय व किती महिन्यांत सदर मोहिम पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक २२ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ आणि मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ च्या कलम ५ नुसार आदेश पारित करताना शेत रस्ता जात असलेल्या शेताचा गट नं. / सर्वे नं. शेतरस्त्याची रुंदी, लांबी, दिशा व सीमा इत्यादी बाबत ७/१२ उताऱ्याच्या इतर

हक्क या सदरात नोंद घेण्याबाबत सक्षम अधिकारी / प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. यानुसार क्षेत्रीयस्तरावर ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात नोंद घेण्यात येत आहेत.

गाव नकाशावरील शेत/पाणंद रस्त्याची नोंद ७/१२ उता-यावर इतर हक्क या सदरी नोंद घेण्यासाठी ई-फेरफार प्रणालीमध्ये नव्याने विकसन करण्याबाबत जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडून राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर विकसनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संबधित नोंदी ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शहरी भागात गृहनिर्माण संस्थांसाठी अकृषिक कर माफ करण्याबाबत

**(२) * २३७२६ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागात गृहनिर्माण संस्थांसाठी अकृषिक (NA) कर माफ करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये घेतला असून अद्याप कोणताही औपचारिक शासन निर्णय जारी न केल्यामुळे गृहनिर्माण संस्थांना कर भरण्याकरिता अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुमारे २ लाख शहरी गृहनिर्माण संस्थांपैकी जवळपास १.९ लाख संस्था अकृषिक कर भरत असून, काही गृहनिर्माण संस्थांनी सदर कर भरणे थांबविले असून इतरांनी दंडात्मक कारवाईच्या भीतीने कर भरणे सुरू ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गृहनिर्माण संस्थांच्या करमाफी संदर्भातील मंत्रिमंडळ निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यासाठी शासनाने ठोस कालमर्यादा निश्चित केली आहे काय, तसेच या निर्णयाचा लाभ मागील कालावधीसाठी (retrospective effect) देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, ज्या गृहनिर्माण संस्थांनी कर भरणे थांबविले आहे, त्या गृहनिर्माण संस्थांकडून महसूल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालये व आयकर अधिकारी यांच्यामार्फत अकृषिक कर वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने गृहनिर्माण संस्थांच्या करमाफीसंदर्भातील मंत्रिमंडळ निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

राज्यातील निवासी, वाणिज्य व औद्योगिक वापराखालील जमिनीवरील संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला होता. तथापि, सदर निर्णयाचे प्रशासकीय कारणास्तव कायद्यात रुपांतरण झाले नाही. मात्र दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील अकृषिक कर आकारण्याबाबतच्या तरतूदी रद्द करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्र जमीन महसूल (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ नुसार, अकृषिक कर आकारणीच्या तरतुदी रद्द करण्यात आल्या आहेत. सदर सुधारणा अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एक रकमी रुपांतरण अधिमूल्य आकारण्यात येणार आहे.

तसेच, सदर सुधारणेच्या अनुषंगाने महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एनएपी-२०२५/प्र.क्र.१७७/जमीन-०१ अ, दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ अन्वये राज्यातील बिनशेती झालेल्या मिळकतींवर दरवर्षी आकारला जाणारा अकृषिक कर आकारण्यात येवू नये, तसेच सदर सुधारणेच्या दिनांकापर्यंत दरवर्षी आकारला जाणारा थकीत अकृषिक कर वसूल करु नये, त्याऐवजी सदर सुधारणा अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एक रकमी रुपांतरण अधिमूल्य आकारण्यात यावे अशा स्वरुपाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सारंगवाडी (ता. मेहकर, जि. बुलढाणा) येथील वॉटरफ्रंट कन्ट्रक्शन प्रा. लि. पुणे कंपनीने विनापरवाना गौण खनिज उत्खनन केल्याबाबत**

**(३) * २९२२५ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारंगवाडी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील वॉटरफ्रंट कन्ट्रक्शन प्रा.लि. पुणे या कंपनीने साठवण तलावाचे काम करताना विनापरवाना गीट्टी क्रशर मशीन लावून अवैध गौण खनिज उत्खनन केल्यामुळे स्थानिक नागरिकांनी दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये गठीत समितीच्या शिफारशीने व झालेल्या चौकशीत दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ नुसार रु.६,६२,२६,७२४/-रुपये व रा.प्र.क्र. एमएनएल.३७/हिवरा खुर्द-सारंगवाडी/१६/२०१८-१९ प्रकरणात दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या फेर चौकशी आदेशानुसार रु. २२,५६,५०,४००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत कोणताही स्थगन आदेश नसताना व वारंवार मागणी करूनही सदर कंपनीकडून दंडात्मक रकमेची वसुली करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह वसुली करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या प्रकरणी संबंधित कंपनीने दंडात्मक रक्कम शासन जमा केलेली नसल्याने त्यांच्याविरुध्द महसूल वसुली प्रमाणपत्र (RRC) प्रमाणे वसुली करण्यासाठी संबंधित कंत्राटदार यांच्या मालमत्ताची माहिती गोळा करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

त्याचप्रमाणे संबंधित कंपनीने सारंगवाडी तलावाच्या कामाच्या अनुषंगाने गौण खनिजाच्या वापरापोटी १२.५४ कोटी स्वामित्वधन शासन जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित कंत्राटदार यांच्या देयकातून रु.१०.६४ कोटी इतकी स्वामित्वधनाची रक्कम जलसंधारण अधिकारी, बुलढाणा यांनी कपात केली आहे. उर्वरित स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) परिसरातील भूसंपादित शेतकऱ्यांना सातबारा व मालकी हक्क नोंदी पूर्ण करुन योग्य मोबदला देण्याबाबत

**(४) * २७८८८ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) परिसरातील राणीशिगाव, हनुमाननगर, चंद्रनगर,शिगाव तसेच गोवणे गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी सूर्या कालवा प्रकल्प, बुलेट ट्रेन व वाढवण बंदर प्रकल्पासाठी भूसंपादन व पुनर्वसनासाठी देण्यात आल्या असून संबंधित जमिनींचे सातबारा ताबा अथवा मालकी हक्क अद्याप शेतकऱ्यांच्या नावावर नोंदविण्यात आलेले नाहीत, तसेच अनेक शेतकऱ्यांना मागील ४० ते ४२ वर्षांपासून मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नसणे, भूसंपादित जमिनीची भरपाई व नुकसान भरपाई देण्यात आली नसल्यामुळे जोपर्यंत जमिनींची नोंद व योग्य मोबदला दिला जात नाही, तोपर्यंत विविध प्रकल्पांना विरोध करण्याची भूमिका ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०२६ मध्ये घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्या उक्त मागणीची पुर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) पालघर जिल्हा अंतर्गत पालघर तालुक्यातील जमिनी राज्य/केंद्र शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी संपादीत करण्यात आल्या आहेत. यामध्ये सुर्या प्रकल्पाच्या कालव्यांच्या बांधकामासाठी मौजे शिगांव, हनुमाननगर, वणई, चंद्रनगर व गोवणे येथील कालव्यांसाठी आवश्यक जमीनीपैकी ३८.८०.० हे. आर. क्षेत्र संपादीत करण्यात येऊन त्याबाबतचा मोबदला शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेला आहे. हनुमाननगर व नेवाळे या गावातील काही प्रकल्पग्रस्तांच्या अधिकार अभिलेख्याचा आकारबंद घडवून अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरित जमिन संपादनाबाबत भूसंपादन संस्थेकडील एसआयए मधून सुट मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही नियोजित आहे.

तसेच वाढवण बंदर ग्रिनफिल्ड महामार्गासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत राणीशिगांव, हनुमाननगर व शिगांव मधील जमिनींचे निवाडे जाहीर करुन मोबदला वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२), (३) व (४) सुर्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जमिनींना पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक कालवे व उपकालव्यांचे बांधकाम १९८५ ते १९९२ दरम्यान झालेले असल्याने सदर कालव्याचे नूतनीकरण सिंचन पुनर्स्थापना निधी व महाराष्ट्र सिंचन क्षेत्र सुधारणा कार्यक्रमांतर्गत बंदिस्त नलिका वितरण प्रणालीव्दारे पाटबंधारे विभागामार्फत प्रगतीत आहे.

मौजे हनुमाननगर येथील ग्रामस्थांनी/ प्रकल्पग्रस्तांनी सुर्या प्रकल्पाच्या अनुषंगाने वाटप करण्यात आलेल्या भूखंड/पर्यायी जमिनीचे ७/१२ घडविल्यानंतर वाढवण बंदर प्रकल्पाचे कामकाज सुरु करावे या मागणीबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडील त्रुटी पुर्ततेनंतर कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे.

----------------

## मोरोशी (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील आश्रमशाळेमधील वसतीगृहात विद्यार्थिनीने केलेली आत्महत्या

**(५) * २५१८३ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरोशी (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आश्रमशाळेत इयत्ता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने वसतिगृहात आत्महत्या केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने पालक व ग्रामस्थांनी या घटनेची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या आत्महत्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यासह भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, मृत विद्यार्थीनीच्या पालकांकडून चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रस्तूत घटनेच्या चौकशीसाठी प्रकल्पस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालास अनुसरुन दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व स्त्री अधिक्षिका यांना निलंबित करुन विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी टोकावडे पोलीस स्टेशन येथे पोक्सो अंतर्गत दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी गुन्हा दाखल केला असून पोलीसांनी आरोपीस दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी अटक केली असून आरोपी कारागृहात असून त्याची चौकशी सुरु आहे.

अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये या उद्देशाने प्रकल्पातंर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच वसतीगृह येथील सर्व कर्मचारी यांची कार्यशाळा घेऊन समुपदेशन केलेले आहे. तसेच विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खरातवाडी (जि. सोलापूर) (पंढरपूर वनपरिक्षेत्र) येथे अवैध मुरुम वाहतूक करणाऱ्या तस्करांनी महिला वन अधिकाऱ्यावर केलेला जीवघेणा हल्ला

**(६) * २४७२१ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खरातवाडी (जि. सोलापूर) (पंढरपूर वनपरिक्षेत्र) येथे अवैध मुरुम वाहतूक करणाऱ्या तस्करांनी महिला वन अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला केल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने अवैध मुरुमाची वाहतुक करणाऱ्यांना विचारणा केली असता त्यांना टिपरखाली चिरडून मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुरुम माफियांकडून होणाऱ्या या बेकायदा कृत्यांमुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्ह्यात अशा प्रकारे वाढलेल्या अवैध गौण खनिज उत्खननामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून यामुळे प्रशासकीय कामात अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित मुरुम तस्करांवर कारवाई करण्यासह वन कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सोलापूर जिल्ह्यातील एकूण गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणांवर प्रतिबंध आणण्याच्या अनुषंगाने, तालुकास्तरावर गस्ती पथकाची नेमणूक करुन त्यावर परिणामकारक कारवाई करण्यात आली आहे.

सन २०२५-२०२६ मध्ये सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणांत एकूण रुपये १२.४१ कोटी दंड आकारला असून एकूण ६६ प्रकरणांत गुन्हे दाखल केले आहेत. तसेच, MPDA कायद्यानुसार एकूण १६ इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.
(४) वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक प्रकरणी विविध कायदे/अधिनियम/नियम यान्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार क्षेत्रियस्तरावर कार्यवाही करण्यात येते.

सोलापूर जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणांत शासकीय अधिकारी कर्मचारी यांचेवर हल्ले झालेले १० प्रकरणे आढळून असून सदर प्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.
(५) वन कर्मचाऱ्यांवर मुरुम माफीयांनी केलेल्या हल्ल्यास अनुसरुन संबंधितांवर गु.र.नं. ०००३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच त्यांचेवर वन अधिनियम, १९२७ नुसार वन गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पीक पेरा नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींबाबत

**(७) * २४९२७ श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रब्बी हंगाम सन २०२५–२६ साठी पीक पेरा नोंदणी बंधनकारक असताना अपुऱ्या तांत्रिक सुविधा, नेटवर्क समस्या व ॲप नीट कार्यरत नसल्यामुळे शेतकऱ्यांना पीक पेरा नोंदणी करता येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीक पेरा नोंदणी न झाल्यामुळे शेतकरी पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील मदत, पीक कर्ज, शासकीय योजना व अनुदानांच्या लाभापासून वंचित राहत असून त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागात नेटवर्कचा अभाव, स्मार्टफोनचा अभाव व तांत्रिक अज्ञान यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून पीक पेरा नोंदणी सक्तीची असतानाही शासनाकडून पुरेशी मदत व पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून न दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पीक पेरा नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना कोणताही लाभ नाकारला जाणार नाही यासाठी ऑफलाईन नोंदणी, मुदतवाढ, तसेच विशेष शिबिरे किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) ई-पीक पाहणी मोबाईल ॲपवर नाव नोंदणी ही प्रक्रिया शेतावर जाऊन करण्याची गरज नसून केवळ नाव नोंदणी करण्यासाठी इंटरनेट सुविधा आवश्यक आहे. तसेच नाव नोंदणीची प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागते.

पीक पाहणी करतेवेळी नेटवर्क मिळत नसणे व इतर तांत्रिक अडचणी या तात्पुरत्या स्वरूपाच्या असून त्या तात्काळ दुरुस्त केल्या जातात. तसेच पीक पाहणी करतेवेळी नेटवर्क नसतानाही शेतातील पीकांचा फोटो काढून नंतर नेटवर्क क्षेत्रात आल्यावर अपलोड करून पीकाची नोंदणी करता येते. प्रत्यक्ष शेतामध्ये पीकांची नोंद करण्यासाठी इंटरनेटची आवश्यता नाही. एक मोबाईल हॅंडसेट वरुन १०० खातेदारांची नाव नोंदणी करून पीक पाहणी नोंद करता येते. शेतकऱ्यांना पीक पाहणी नोंद करणेकरीता प्रत्येक गावात सहाय्यक यांची नेमणूक करणेत आलेली आहे. राज्यस्तरावर शेतकऱ्यांकरीता हेल्पलाईन कक्षामार्फत (हेल्पलाईन क्रमांक ०२०-२५७१ २७१२) सुध्दा तांत्रिक अडचणींचे निवारण केले जाते.
(४) कृषि विभागाचा शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ मधील तरतूदीनुसार हंगामाच्या सुरूवातीला ४५ दिवस शेतकरी स्तरावरून पीक पाहणी करण्यात येते. शेतकरी स्तरावरून करावयाची पीक पाहणी ८० टक्के पर्यंत होण्याबाबत सहाय्यकांची जबाबदारी असते. शेतकरी स्तरावरून पीक नोंदणीचा कालावधी समाप्त झाल्यावर सहाय्यक स्तरावरून पीक नोंदणी करण्याची तरतूद आहे.

राज्यात रब्बी हंगाम २०२५-२६ अंतर्गत शेतकरी स्तरावरून पीक नोंदणीसाठी दिनांक १० डिसेंबर, २०२५ ते २४ जानेवारी, २०२६ हा कालावधी तसेच सहाय्यक स्तरावरून पीक पाहणीसाठी दिनांक २५ जानेवारी, २०२६ ते १० मार्च, २०२६ हा कालावधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदनापूर (जि.जालना) तालुक्यासह मराठवाड्यातील मंजूर सिंचन विहिरींची कामे अधिकृत संकेतस्थळावरून बंद केल्याबाबत

**(८) * २९१९६ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदनापूर (जि.जालना) तालुक्यात मनरेगा अंतर्गत ६५७ सिंचन विहिरींना मंजुरी देण्यात आली असून या मंजूर विहिरींची कामे मनरेगाच्या अधिकृत संकेतस्थळावरून अचानक बंद केली अथवा नोंद रद्द करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात अशीच परिस्थिती निर्माण झाली असून विहिरीचे खोदकाम पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना अद्याप एकही रुपया अनुदान मिळालेले नसून प्रत्येक विहिरीसाठी सुमारे ४ लाख रुपयांचे अनुदान अपेक्षित असूनही ते अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या पोर्टलवर काम बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मस्टर निघत नसल्याने मजुरी व देयके प्रलंबित असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून पंचायत समिती (बदनापूर) प्रशासन केवळ वरिष्ठांकडे मार्गदर्शन मागत असून कोणतीही कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत नियोजन (रोहयो) विभागाने चौकशी करुन याप्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासह सिंचन विहिरी मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे.

जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मध्ये एकूण १११२ सिंचन विहीरींच्या कामांना मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी ४६५ कामांचे मस्टर काढण्यात आले आहे. मंजूरी दिलेल्या विहीरींपैकी उर्वरीत ६५७ कामे सुरु करण्यात आली नाहीत. मनरेगा अंतर्गत मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या सिंचन विहीरी मंजूर दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सुरु करणे सेक्युअर प्रणालीमध्ये बंधनकारक आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश देऊनही दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यानंतरही कामे सुरु न केल्यामुळे केंद्र शासनामार्फत बदनापूर तालुक्यातील मनरेगा अंतर्गत मंजूर केलेली एकूण ६५७ सिंचन विहिरींची कामे अधिकृत संकेतस्थळावरुन बंद केली आहेत.
(२) हे खरे नाही.

सिंचन विहिरींची कामे सुरु न झाल्यामुळे नरेगा संकेत स्थळावर कामे बंद झालेली आहे. त्यामुळे मजुरीबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.मनरेगा अंतर्गत केंद्र शासनामार्फत प्रति विहीर रुपये ५ लाख या मर्यादित विहिरींसाठी अनुदान वितरीत करण्यात येते. जालना जिल्ह्यात अद्यापपर्यंत १४९०५ विहीरी पूर्ण झाल्या असून त्याप्रित्यर्थ रु.२८९.६३ कोटी खर्च झाला आहे. तर मराठवाडा विभागात १२५०९० विहीरी पूर्ण झाल्या असून त्याप्रित्यर्थ रु.२७८८.९० कोटी खर्च झाला आहे. सद्य:स्थितीत जालना जिल्ह्यात १२५०२ विहीरींची कामे सुरु असून त्यावर १६३.४२ कोटी खर्च झाला आहे तसेच मराठवाडा विभागात ११०४०७ विहीरींची कामे सुरु असून त्यावर १८३९.२१ कोटी खर्च झाला आहे.
(३) ६५७ विहिरींची कामे संकेत स्थळावरुन बंद झाल्यामुळे मजुरी व देयके देण्याच्या प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि विहिरींची मागणी असलेल्या शेतकऱ्यांनी नव्याने प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत विचार करता येईल.
(४) शेतकऱ्यांना तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. कुशल व अकुशल मजुरी देण्यासाठी ई-के.वाय.सी. करणे व कुशलची निधी वितरणाचे आदेश (FTO) तयार करणे याबाबतची कार्यवाही करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०२२ -२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीचा निधी प्रलंबित असल्याबाबत

**(९) * २२९९५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.करण देवतळे (वरोरा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अतिवृष्टी, पूर, दुष्काळ व अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकरी व नागरिकांसाठी सुमारे ७०० कोटी रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला असून सदर निधीचे वितरण अद्याप प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वर्षात नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, पंचनामे व प्रस्ताव शासनाकडे विहित वेळेत सादर केले असतानाही व केंद्र शासनाकडून पुरेसा निधी प्राप्त होऊनही किंवा राज्य शासनाच्या आपत्ती निवारण निधीत उपलब्धता असूनही उक्त वर्षाचा ७०० कोटी रुपयांचा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात विलंब होत असल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त वर्षातील पात्र शेतकऱ्यांना अनुदान वितरणात दिरंगाई करणाऱ्यांविरुध्द कारवाई करणेसह उक्त प्रलंबित निधी वितरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१ ) हे खरे नाही.
(२) व (३) शासनाने अतिवृष्टी २०२१-२०२२ व २०२३ तसेच अवेळी पाऊस २०२२-२३ मधील ६१.०७ लक्ष शेतकऱ्यांना रु.५०२२ कोटी निधीचे DBT द्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात निधी वितरित करण्यात आला. उर्वरित रु.१२७ कोटी एवढा निधी वितरणाची कार्यवाही पुढील कारणामुळे पूर्ण होऊ शकली नाही. यामध्ये शेतकऱ्यांकडून E- KYC न होणे, क्षेत्राबाबत तहसिल स्तरावर फेर तपासणी करणे, शेतकऱ्यांची वारस नोंदणी निश्चित करणे, नावांमध्ये द्विरुक्ती, सयुंक्त कुटुंबामध्ये पात्र शेतकरी ठरविणे, इ. कारणास्तव निधी वाटप प्रलंबित असुन या बाबी निर्धारणाची कार्यवाही सुरु असुन जशी जशी प्रक्रिया पूर्ण होत आहे. त्यांना DBT प्रणालीद्वारे निधी वितरित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी योजनांसाठीचा निधी इतर उपक्रमांसाठी वळविल्याबाबत

**(१०) * २३०४९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजना, बी-बियाणे, खत वितरण, सिंचन, पीक संरक्षण व कृषी यांत्रिकीकरण आदी उपक्रमांसाठी आवश्यक निधी असतानाही कृषी विभागाचा निधी इतर उपक्रमांसाठी वळविण्यात आल्यामुळे अनेक कृषी योजना प्रभावीपणे राबविता येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी योजनांच्या मंजूर ४०० कोटी रुपयांपैकी केवळ ३० कोटी रुपयांचाच निधी खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात निधीअभावी विविध कृषी योजना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कृषी योजनांचा निधी इतर उपक्रमांसाठी वळविल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या कृषी योजनांचा निधी अन्य उपक्रमांसाठी न वळविण्याबाबत तसेच सर्व कृषी योजना नियोजित कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) कृषि विभागाच्या सर्वच योजनांना पुरेशा प्रमाणात महाराष्ट्र व केंद्र शासनाने निधी मंजूर केलेला आहे. सदर निधी संबंधितांकडून पाठपुरावा करुन प्राप्त करुन घेऊन विविध योजनांतर्गत "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वाद्वारे निवडलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरूआहे. सद्यस्थितीत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध कृषि योजनांसाठी रु.४२०६.२९ कोटी खर्च करण्यात आले आहेत.
(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात शेतीमालाला योग्य हमीभाव मिळणे तसेच खते-बियाण्यांच्या दरवाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(११) * २३४१८ श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अतिवृष्टी, उत्पादन खर्चात वाढ व बाजारातील अस्थिरतेमुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळत नसल्याचे तसेच खते व बियाण्यांच्या दरात प्रति बॅग सुमारे २०० ते २५० रुपयांची वाढ झाल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतीमालाचे बाजारभाव स्थिर ठेवणे, हमीभाव प्रभावीपणे लागू करणे तसेच खते-बियाण्यांच्या दरवाढीवर नियंत्रण ठेवण्यात शासनाकडून अपेक्षित उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याच्या तक्रारी शेतकरी संघटनांकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतीमालाला योग्य हमीभाव मिळून खते-बियाण्यांच्या दरवाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत व शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) शेतमालाला हमीभाव देणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते. युरीया व डाय अमोनियम फॉस्फेट खतांच्या किंमती स्थिर आहेत. सिंगल सुपर फॉस्फेटसह अन्य खतांच्या किंमतीत अल्प वाढ झाली आहे. गहू व हरभऱ्याच्या बियाण्यांव्यतिरिक्त इतर बियाण्यांच्या किंमतीमध्ये वाढ झालेली नाही.
(३) शेतीमालाला योग्य हमी भाव मिळावा यासाठी राज्य कृषि मूल्य आयोगामार्फत हमीभावाच्या किंमतींची शिफारस केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाला करण्यात येते.

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीन व तूर खरेदी केली आहे.

खतांच्या किंमती कमी होण्यासाठी रासायनिक खतांवरील वस्तू व सेवा कर रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविला आहे. सन २०२५ पासून केंद्र शासनाने खतांवरील वस्तू व सेवा कर १२% वरुन ५% केला आहे.

शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठांच्या उपलब्धतेसाठी निरीक्षकांमार्फत शेतकऱ्यांना कृत्रिम टंचाई, साठेबाजीने खत विक्री होणार नाही या बाबत नियमित निविष्ठांची व दुकानांची तपासणी करण्यात येते.

अप्रमाणित/बोगस खते यांची विक्री होऊ नये यासाठी खत नियंत्रण आदेश, १९८५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते. खतांचे लिंकींग बंद करण्यासाठी उत्पादक कंपन्या व विक्रेते यांना वेळोवेळी सक्त सूचना दिलेल्या आहेत. लिंकींग न करणेबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते.

राज्यामध्ये ४९७३५ खत विक्रेते व ७३२ खत उत्पादक यांची गुण नियंत्रण निरीक्षकांमार्फत तपासणी केली आहे. त्यापैकी १२४० खतांचे नमुने अप्रमाणित आढळले आहेत. त्यावर कायदेशीर कारवाई सुरु आहे. खतांचा रु.४०७.५६ लाख रक्कमेचा २३१९.५१ मे.टन साठा जप्त केला आहे. खत विक्रेत्यांचे ९२६ परवाने निलंबीत व ५३१परवाने रद्द केले आहेत. राज्यामध्ये ६३ पोलिस प्रकरणे दाखल केली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१२) * २५७९८ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरुध्द महसूल विभागाच्या पथकाने डोमा ते देडपाणी रोडवर अवैध वाळू भरलेला डंपर पकडला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात डोमामार्गे मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात विनापरवानगी वाळूचे डंपर चालविले जात असून अनेक दिवसांपासून वाळू माफियांचा या भागात वावर वाढला असून अवैध वाळू वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, चांगेफळ फाटा (जि.बुलढाणा) येथे महसूल विभागाच्या पथकाने दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान विनारॉयल्टी रेती वाहतूक करणारा टिप्पर पकडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही जिल्ह्यातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

या भागातील अवैध वाहतूक रोखण्याकरिता मौजा घटांग येथील कुकरू फाट्यावर तपासणी नाका स्थापन केलेला असून सदर तपासणी नाक्यावर मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) नाही, तथापि, मात्र दिनांक ५.०१.२०२६ रोजी चांगेफळ शिवारात चांगदेवी मंदीराजवळ व दिनांक ९.०१.२०२६ रोजी चांगेफळ ते बेलोरा रोडने ट्रॅक्टरव्दारे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या एकूण २ प्रकरणी पोलीस विभागाने कारवाई केली आहे.

(४) बुलढाणा जिल्ह्यातील उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन, किनगाव राजा यांच्याकडून संबंधित ट्रॅक्टर मालकावर गुन्हे दाखल केले व महसूल कारवाई करण्यासाठी तहसिलदार, सिंदखेडराजा यांनी संबंधित ट्रॅक्टर मालकास म्हणणे मांडण्यासाठी नोटीसा बजाविल्या आहेत.

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालूक्यात डोमा ते देडपाणी रोडवर अवैध वाळू वाहतूक करताना आढळून आलेल्या टिप्परवर उपविभागीय अधिकारी, धारणी याच्याकडून रू. ४,११,५९० दंडात्मक कारवाई करून वसूल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## पाचोरा (जि.जळगांव) तहसिलदार कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बनावट कागदपत्राद्वारे अनुदानासाठी दिलेल्या रक्कमेचा केलेला गैरव्यवहार

**(१३) * २४३६४ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) येथील तहसिलदार कार्यालयातील संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या ३४७ पात्र शेतकऱ्यांच्या अनुदानासाठी देण्यात आलेली रक्कम रुपये १ कोटी २० लाख १३ हजार रुपये शेतकऱ्यांच्या ऐवजी बनावट दस्तऐवज तयार करुन मित्रांसह विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात वर्ग केल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तहसिलदारांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा केलेला गैरवापर याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या चौकशी आदेशानुसार तहसिलदारांनी वरिष्ठांकडे अहवाल सादर करुनही पुढे संबंधित कर्मचारी व गुन्हेगारांवर कारवाई न झाल्यामुळे तसेच शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अनुदान न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने याप्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) चौकशी अहवालानुसार दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द पाचोरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले व त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. या व्यतिरिक्त सदर प्रकरणात दोषी आढळून आलेल्या खाजगी व्यक्तींना अटक ही करण्यात आली आहे.

तहसिलदार, पाचोरा यांच्या अहवालानुसार कोणताही पात्र शेतकरी अनुदानापासुन वंचित राहिलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यातील लाहेरी शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा

**(१४) * २८७६३ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या भामरागड प्रकल्प कार्यालयांतर्गत लाहेरी येथील शासकीय आश्रमशाळेतील ६० विद्यार्थ्यांना दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान अन्नातून विषबाधा झाल्याने त्यांची प्रकृती बिघडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना अहेरी येथील महिला व बाल रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी दोन विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा होण्याचे प्रकार वाढून देखील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार पालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चोकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार अन्न पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, शासकीय आश्रामशाळा लाहेरी येथील विद्यार्थ्यांची प्रकृती दुषित अन्न सेवनामुळे बिघडल्याचे निदर्शनास आले.
(२) ग्रामीण रुग्णालय भामरागड येथे उपचारासाठी ५३विद्यार्थ्यांना दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ५१ विद्यार्थ्यांवर त्याठिकाणी उपचार करण्यात आले. उर्वरीत २ विद्यार्थ्यांवर उपजिल्हा रुग्णालय, अहेरी येथे उपचार करण्यात आले त्यापैकी एका विद्यार्थ्यांवर एम्स, नागपूर येथे उपचार करण्यात आले. आता सर्व विद्यार्थी सुखरुप असुन त्यांची प्रकृती स्थिर आहे.
(३) अशी प्रकारे पालकांकडून तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) व (५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड, जि.गडचिरोली या कार्यालयाद्वारे प्राथमिक चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार स्वंयपाकगृह, कोठीगृह, भोजनहॉल मध्ये स्वच्छतेबाबत व आरोग्याबाबत दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले. त्यामुळे या शाळेचे मुख्याध्यापक व अधिक्षक यांना निलंबीत करण्यात आले आहे.

प्राथमिक चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार माध्यमिक मुख्याध्यापक तसेच अधिक्षक यांना निलंबीत करण्यात आलेले आहे. तसेच शाळेतील महिला अधिक्षीका व वर्ग-४चे पाच कर्मचारी यांची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा दिलेली आहे.

या आश्रमशाळेतील ३९ प्रकारचे अन्नधान्य विषयक नमुने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. सदर तपासणी अहवालानुसार सर्व अन्न नमुने प्रमाणित घोषित केले आहेत. तसेच पाण्याचे नमुने देखील विहित मानकाप्रमाणे असल्याचे जिल्हा पाणी गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळा गडचिरोली यांच्या अहवालावरुन दिसून येते.

आश्रमशाळेला सर्व अन्नधान्याचा नव्याने पुरवठा करण्यात आला असुन स्वयंपाकासाठी नवीन भांडी देण्यात आली आहेत. आठवड्यातुन दोनदा ताजा भाजीपाला पुरवठादाराकडून मागविण्यात यावा याबाबत मुख्याध्यापक व अधिक्षक यांना सुचना देण्यात आल्या आहेत.तसेच पिण्याच्या पाण्यासाठी नवीन आर ओ वॉटर प्युरीफायरचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (ता. केळापूर, जि. यवतमाळ) व मौजे लखमापुरी (ता.अंबड, जि. जालना) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१५) * २८९२४ श्री.महेश सावंत (माहिम), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरीच्या मोजमापात अनियमितता करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली असल्याची तक्रार समर्थन संस्थेने मा. मंत्री, रोजगार हमी योजना यांच्याकडे दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांढरकवडा पंचायत समितीमध्ये याआधी रोजगार हमी योजनांच्या कामात ५४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी अद्यापही प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पांढरकवडा येथील १७४ कामांपैकी ४० कामाचीच चौकशी पूर्ण झाली असून उर्वीरित १३३ कामांची चौकशी अद्यापही पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मौजे लखमापुरी (ता.अंबड, जि.जालना) येथे रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरिंच्या कामात गट विकास अधिकारी, तांत्रिक अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी नियमबाह्य गट बदलून गट क्र.२३१ मध्ये मंजूर झालेली विहिर गट क्र.१५३ मध्ये बदलण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहरींच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच मौजे लखमापुरी (ता.अंबड, जि.जालना) येथे रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरींच्या कामात गट विकास अधिकारी, तांत्रिक अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांवर नियोजन (रोहयो) विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहिरींच्या कामात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी तत्कालीन गट विकास अधिकारी यांना निलंबित केले आहे. तसेच, सर्व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे व कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले आहे.

मौजे लखमापूरी (ता.अंबड, जि.जालना) येथे ग्राम रोजगार सेवक यांचेकडून कर्तव्यात कसुर केल्याप्रकरणी अनुदान रक्कम रु.४६३३८/- वर ७.८०% व्याजासह वसुल करण्याची कारवाई सुरु असून त्यांना ग्राम रोजगार सेवकाच्या पदावरुन कमी करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## कुलाबा, मुंबई येथील ससून डॉकमधील १८ गोदामांना बीपीटी प्राधिकरणाने टाळेबंदी लागू केल्याबाबत

**(१६) * २६०२१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट ट्रस्ट प्राधिकरणाने ससून डॉक येथील १५० वर्ष जुनी १८ गोदामे पोलीस बंदोबस्त करुन सक्तीने टाळेबंद केल्याच्या निषेधार्थ कोळी महासंघ व ससून डॉक मासेमारी बंदर बचाव कृती समिती, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती व मच्छिमार महासंघातर्फे दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान ससून डॉक ते आझाद मैदानादरम्यान हजारो कोळी बांधवांनी मुक मोर्चा काढून आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गोदामे महामंडळाने कोळी बांधवाना भाड्याने दिली असून कोळी बांधव महामंडळास दरमहा नियमित भाडे अदा करीत होते, परंतु महामंडळाने मुंबई पोर्ट ट्रस्ट प्रशासनाला भाडे रक्कम अदा न केल्यामुळे त्यांनी गोदामास टाळेबंदी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदामे बंद केल्यामुळे उदरनिर्वाह करणाऱ्या १२ हजार मच्छिमार कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर गोदाम पुन्हा कोळी बांधवाना वापरण्यास देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) होय, हे खरे आहे.

ससून डॉक मधील संपूर्ण जागा मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची असून १८ गोदामांपैकी महामंडळाकडे गोडावून क्र. १५८ व १७७३ हे २ गोडावून होते. सदर दोन्ही गोडावून क्र. १५८ व १७७३ महामंडळास १९७३ साली स्थापनेच्या वेळी महाराष्ट्र शासनाने भाडे तत्वावर भाडेकरूंसह हस्तांतरीत केले होते.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर गोडावून मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना परत करण्यात आलेले आहे. इतर १६ गोडावून मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडे आहेत.

(२), (३) व (४) ससून डॉक येथील गोदाम क्र.१५८ व गोदाम क्र.१७७३ या गोदामांच्या थकीत रक्कमेपैकी, भाडेकरुनी रु.२.७७ कोटी इतकीच रक्कम महामंडळाकडे भरणा केली, त्यापैकी महामंडळाने सर्वीस चार्ज वजा करुन रु.२.५४ कोटी इतकी रक्कम मुंबई पोर्ट ट्रस्टला भरणा करण्यात आली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टने दिनांक २८ जून, २०२५ रोजी गोदाम क्र.१५८ ची रु. ८६.०५ कोटी रक्कम भाडेकरु यांचेकडे थकीत असल्याचे कळविले आहे.

गोदाम क्र.१५८ व गोदाम क्र. १७७३ ची रक्कम भाडेकरु यांचेकडे थकीत असल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ही गोदामे मुबंई पोर्ट ट्रस्ट यांनी ताब्यात घेऊन सिल केली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१७) * २३९२० श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेत झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये दोन लेखाधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांमार्फत पोलीस प्रशासनास पत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये सुमारे ३ हजार २५८ शेडनेटची उभारणी करण्यात आली असताना काही तत्कालीन अधिकाऱ्यांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार व नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणात सुमारे २५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला असून ३८ पथकांमार्फत चौकशी सुरू असतानाही केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करून वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय व अपहार झाला असून या गैरव्यवहारामुळे खऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या हक्काचा निधी त्यांना मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जालना जिल्ह्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेत झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यासह अशा योजनांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी लाभार्थ्यांची निवड आणि निधी वितरण प्रणालीमध्ये अधिक तांत्रिक पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.

शासन पत्र दिनांक, ५ डिसेंबर, २०२५ अन्वये प्रस्तुत प्रकरणी संबंधित कंत्राटी लेखाधिकारी यांच्याविरूध्द गुन्हे दाखल करणेबाबत आयुक्त (कृषि) यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने संबंधित लेखाधिकारी यांच्याविरूध्द पोलिस स्टेशन जालना येथे गु.र.नं.००९७/२०२६ दिनाक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(२), (३), (४) व (५) सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेंतर्गत जालना उप विभागांतील तालुक्यांमध्ये शेडनेट हाऊस या घटकांची अंमलबजावणी करतांना मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होऊन झालेल्या अनियमितेबाबत संबंधित ४ अधिकाऱ्यांविरूध्द दिनांक, २३ सप्टेंबर, २०२४ च्या शासन ज्ञापन व आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सूरू करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, छ.संभाजीनगर विभाग, छ.संभाजीनगर यांना "चौकशी अधिकारी" व कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना "सादरकर्ता अधिकारी" म्हणून नियुक्ती दिनांक ५ डिसेंबर २०२५ च्या आदेशान्वये करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत १०० टक्के तपासणी अहवालाच्या अनुषंगाने, अनियमिततेस जबाबदार असलेले उर्वरित अधिकारी / कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करणे, वसुलपात्र रकमेबाबत नोटीस देणे, यापुर्वी विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पुरवणी दोषारोप सादर करणे इ. बाबत विभागीय कृषी सह संचालक छत्रपती संभाजीनगर यांचेस्तरावर कार्यवाही चालू आहे.

सदरच्या योजनेमध्ये लाभापासून कोणत्याही शेतकऱ्याला वंचित ठेवण्यात आलेले नाही अथवा डावलण्यात आलेले नाही. प्रकल्पाच्या टप्पा १ अंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये ९६,०१२ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ७८६.१९ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला त्यामध्ये प्रामुख्याने शेडनेट या घटकासाठी ३२५८ शेडनेटगृहासाठी लाभार्थ्यांना रुपये २६६.४३ कोटी लाभ देण्यात आला आहे. त्याच प्रमाणे कृषि व्यवसाय घटकासाठी ११५९ लाभार्थ्यांना रुपये १३९.६ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजना प्रकल्प टप्पा २ अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या DBT प्रणाली मध्ये शेतकऱ्यांना अग्रीस्टॅक फार्मर आय डी वापरून अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना अर्ज करण्यासाठी ७/१२ व ८ अ हे दस्तावेज सादर करण्याची आवश्यकता नाही. तसेच MahaDBT प्रणालीमधून शेतकऱ्यांनी यापूर्वी लाभ घेतलेल्या विविध शासकीय योजनेच्या लाभाची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांना लाभदेण्यापूर्वी पडताळणीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोटगुल (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोई सुविधा पुरविण्याबाबत

**(१८) * २८८२७ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोटगुल (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील शासकीय वसतिगृहात स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाहणीत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वसतिगृहातील बेडची दुरवस्था, छत गळती, परिसरातील अस्वच्छता, स्वच्छतागृहाला दरवाजा नसणे तसेच वर्ग खोल्यांना रंगरंगोटी नसणे इ. समस्या निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतिगृहातील गैरसोयीमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चोकशी केली आहे काय,
(४) असल्यास, कोटगुल (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील शासकीय वसतीगृहात सोई सुविधा पुरविण्यासह विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) विभागाच्या बांधकाम व्यवस्थापन कक्षाच्या संबंधित अभियंत्यानी आश्रमशाळेची पाहणी केली असून नजिकच्या कालावधीत आवश्यकतेप्रमाणे दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येतील.

शासकीय आश्रमशाळा कोटगुल येथील तातडीची कामे जसे की, शालेय इमारत, मुलांचे व मुलींचे वसतीगृहातील स्नानगृह व शौचालयाच्या दरवाजाचे कडी-कोयंडे बसविणे, विद्युत फिटींग दुरुस्ती, नळ पाईप दुरुस्ती, शौचालयाच्या चेंबरची साफ-सफाई शालेय इमारतीच्या परिसरात तणनाशक फवारणी इ. कामे करण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्यात येते व आवश्यकतेप्रमाणे औषधोपचार केले जातात तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नियमित रात्रपाळी चौकीदार कार्यरत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोहले (ता.कोरची, जि.गडचिरोली) गावाजवळील टेकडीवर विना परवाना होत असलेली वृक्षतोड

**(१९) * २४०१२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोहले (ता.कोरची, जि.गडचिरोली) गावाजवळील टेकडीवर मंजूर लोह खनिज प्रकल्प परिसरात विनापरवाना बेसुमार वृक्षतोड करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी खनिज उत्खननाची प्रक्रिया सुरू होणार असून काही महिन्यांपूर्वी खाणीपर्यंत जाणाऱ्या रस्त्याला ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला होता, तरीही आदिवासींच्या जमिनी दिशाभूल करून घेण्यात आल्याची तक्रार ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणानी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त गावाजवळील टेकडीवर मंजूर लोह खनिज प्रकल्प परिसरात विना परवाना वृक्षतोड करणाऱ्या संबंधितावर तसेच दिशाभूल करून आदिवासींच्या जमिनी घेणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

तथापी, सदर क्षेत्रातील खाणपट्टयातुन खनीज वाहतुक करण्याकरिता मौजा भिमपुर येथील पडीक असलेल्या सर्व्हे क्र. १७२ व १७३ मधुन तयार करण्यात आलेल्या रस्तामध्ये असलेली झाडे तोडण्याकरिता वनपरिक्षेत्र अधिकारी बेडगाव यांनी दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी परवानगी दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील गरजू घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळण्याबाबत

**(२०) * २३१३१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नव्या वाळू धोरणानुसार शासनाने घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा करून याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ९३ हजार घरकुले मंजूर असून प्रती लाभार्थी ५ ब्रास याप्रमाणे ४ लाख ६५ हजार १२० ब्रास वाळूची गरज असताना माहे एप्रिल, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ पर्यंत केवळ ७ हजार २१४ लाभार्थ्यांना २६ हजार १७७ ब्रास वाळू मिळाली असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील मंजूर घरकुलांची संख्या लाखापर्यंत असूनही अनेक लाभार्थ्यांना जागा नाही, तर गरजू लाभार्थ्यांना वाळू मिळत नसल्याने अनेक घरकुल बांधकामे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घरकुल लाभार्थ्यांना वाळू न मिळण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रकरणी उक्त लाभार्थ्यांना जागा व वाळू मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) ग्रामविकास विभाग, इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विभाग अशा विविध विभागांतर्गत येणाऱ्या घटकांना घरकूल/आवास योजनेतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकूलासाठी साधारण १.२० लाख ते २.५० लाख इतकी मदत त्या-त्या विभागामार्फत दिली जाते. तथापि, अशा योजनेतील घरकूल लाभार्थ्यांना अधिकची मदत व्हावी म्हणून ५ ब्रास मर्यादेत मोफत वाळू देण्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येते. सदर वाळूची मदत संबंधित जिल्ह्यातील वाळू उपलब्धतेनुसार केली जाते.

अहिल्यानगर जिल्हयात सन २०२४-२५ मध्ये ८१,८२८ घरकुले मंजूर असून सदयस्थितीत एकूण ७,४३० लाभार्थ्यांना २७,७७२ ब्रास वाळू उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) अहिल्यानगर जिल्हयात मंजूर एकूण १,२५,७८६ घरकुलांपैकी १०,०७२ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी स्वमालकीची जागा उपलब्ध नव्हती. त्यापैकी ५,९१८ लाभार्थ्यांना विविध योजनेअंतर्गत जागा उपलब्ध करून देण्यात आलेली असून सदयस्थितीत ४,१५४ लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ नुसार अहिल्यानगर जिल्हयात  स्थानिक वापर व घरकुलासाठी एकूण १४३ वाळू गट निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये ३,८३,६९० ब्रास वाळूसाठा उपलब्ध आहे. तसेच पर्यावरण अनुमती प्राप्त एकूण ६ (४२,३३८ ब्रास वाळू साठा) वाळूगटांचे लिलाव झालेले असून त्यातील १०% वाळूसाठा घरकूल लाभार्थ्यांना मोफत उपलब्ध करुन देणे लिलावधारकास बंधनकारक केले आहे.

तसेच, लिलावास प्रतिसाद न मिळालेले १८ वाळूगट (८४,६२१ ब्रास वाळू साठा) हे धोरणामधील तरतूदीनुसार स्थानिक वापर व घरकुलासाठी राखीव ठेवून त्यामधून घरकुलासाठी वाळू उपलब्ध करून देण्याची दक्षता घेतली जात आहे.

सद्यस्थितीत नदीपात्रांमध्ये काही ठिकाणी पाणी असल्याने नदीतून वाळू उपसा करणे शक्य होत नाही. नदीपात्रातील पाणी कमी होताच घरकुल लाभार्थ्यांना वाळू वितरीत करण्याची दक्षता घेतली जात आहे. तसेच, काही घरकूल लाभार्थी हे कृत्रिम वाळूचा वापर करीत आहेत. त्यामुळे वाळू अभावी घरकुलांची कामे बंद असल्याची बाब दिसून येत नाही.

-----------------

## राज्य शासनाने सुरु केलेली पीएच.डी.कृषी फेलोशिप योजनेतील शिष्यवृत्ती थकीत असल्याबाबत

**(२१) * २५९५३ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी क्षेत्रातील उच्चस्तरीय संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने सुरु केलेली पीएच.डी. कृषी फेलोशिप योजनेंतर्गत गत दोन वर्षापासून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व आर्टी संस्थांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देण्यात येते मात्र गत दोन वर्षापासून पी.एच.डी. कृषी फेलोशिप योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच देण्यात न आल्याने राज्यातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांना याचा आर्थिक फटका बसल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीसाठी विद्यार्थ्यांनी यापूर्वी पुणे येथे दिनांक १५ ते २२ सप्टेंबर, २०२५ या आठ दिवसांसाठी अन्नत्याग आंदोलन केले तसेच १३ ते १७ ऑक्टोबर दरम्यान आझाद मैदानात आंदोलनही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी क्षेत्रातील उच्चस्तरीय संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने सुरु केलेली पी.एच.डी. कृषी फेलोशिप योजनेअंतर्गत प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) होय,
(४) अधिछात्रवृत्ती योजनेतंर्गत नव्याने विद्यार्थ्यांची निवड करण्यापूर्वी या योजनेतील विद्यार्थी निवडीचे निकष व कार्यपध्दती, अधिछात्रवृत्तीचे विषय, लाभार्थ्यांची संख्या, अधिछात्रवृत्तीची रक्कम व कालावधी याबाबत सर्वंकष विचार करुन, नवीन स्वरुपात योजना आणण्याकरिता राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून तज्ञ समिती नेमण्यात आली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून नेमण्यात आलेल्या तज्ञ समितीचा अहवाल, सदर समितीने त्या विभागास सादर केला असून,इतर अभ्यासक्रमांबरोबरच कृषि अभ्यासक्रमांतर्गत पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती / शिष्यवृत्तीचा लाभ देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील फळबागांचे तसेच शेतीचे "टूफोरडी" या तणनाशकाचा वापर केल्यामुळे नुकसान झाल्याबाबत

**(२२) * २५४६५ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील १५ हजार हेक्टर वरील द्राक्ष व ५० हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावर डाळिंबाची शेती असून २ लाख हेक्टर उसासहित इतर पिकातील तण नष्ट करण्यासाठी "टूफोरडी" या तणनाशकाचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तणनाशकाच्या फवारणीमुळे द्राक्ष बागांसह इतर फळबागाही जळून गेल्या असून शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास "टूफोरडी" तणनाशकावर बंदी घालण्याची मागणी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाकडून सातत्याने शासनाकडे केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, टूफोरडी तणनाशकावर बंदी घालण्याबाबत तसेच सोलापूर जिल्ह्यातील टूफोरडी तणनाशकाच्या वापरामुळे शेतकऱ्यांच्या द्राक्ष व इतर फळबागाच्या झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.
(२) टूफोरडी या तणनाशकाचा वापर ऊसातील तण काढण्यासाठी करण्यात येतो. त्याच्या फवारणीमुळे ऊसाच्या शेजारील द्राक्ष बागांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) टूफोरडी तणनाशकावर बंदी घालण्याबाबतच्या महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मरिन लाईन्स येथील ‘ जैन जिमखाना’ जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनच्या ताब्यात दिल्याबाबत

**(२३) * २६४६४ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरिन लाईन्स येथील ‘विल्सन जिमखाना’ चे नामकरण “जैन जिमखाना” करण्यात येऊन सदर जिमखान्याचा भुखंड जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनच्या ताब्यात देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण मुंबईतील मरिन ड्राईव्ह येथील समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या पाचपैकी एक मोठे खेळाचे मैदान ख्रिश्चन रिफॉर्म युनायटेड पिपल्स असोसिएशनला सन १८३२ मध्ये भाडेकराराने देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भाडेकरार संपुष्टात आल्यानंतर पुनश्च: अर्ज दाखल केला असतानाही त्यांना मुदतवाढ अथवा भाडेकराराने न देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर परिसरातील रहिवाशांचा विरोध असतांना विल्सन जिमखाना “जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन” ला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) भूलेश्वर महसूल विभागातील भू.क्र.४७१, क्षेत्र १०२५७.८८चौ.मी. विल्सन कॉलेज जिमखाना या मिळकतीबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने शर्तभंगाबाबत सुनावणी घेवून सदरची मिळकत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये शासनजमा केली.

तद्नंतर महसूल व वन विभाग शासन ज्ञापन दिनांक १६ मार्च, २०२४ अन्वये ही शासकीय मिळकत जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेला जिमखाना या प्रयोजनासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विषयाधीन मिळकतीबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये Writ Petition No.४९२२ of २०२४ व Writ Petition No.६१५० of २०२४ व Writ Petition (L) No.२३५७९ of २०२४ या पिटीशन दाखल असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) भूलेश्वर महसूल विभागातील भू.क्र.४७१ ही शासकीय मिळकत Dr. Judson w. Airan, Principal of the Wilson college and ex-officio President of the Wilson College Gymkhana यांना दिनांक १/०१/१९४० पासून ३० वर्षाच्या मुदतीकरीता भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली होती. तद्नंतर सदर मिळकतीचे दिनांक १/०१/१९७० पासून ३० वर्षाकरीता नुतनीकरण करण्यात आले. त्यानुषंगाने दिनांक १५/०९/१९९८ रोजी भाडेपट्टा दस्त युनायटेड चर्च ऑफ नॉर्थन इंडीया ट्रस्ट असोसीएशन यांचे नावे निष्पादीत करणेत आला.

(३) सदर मिळकतीचा भाडेपट्टा दिनांक ३१/१२/१९९९ रोजी संपुष्टात आला. भाडेकरार संपुष्टात आल्यानंतर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे मुदतवाढीसाठी अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २२/०९/२००३ अन्वये जिमखान्यांच्या संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्याबाबतचे धोरण निश्चित करणेत आले होते. सदर धोरणातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे

कार्यालयाकडील दिनांक २२/१०/२००३ रोजीच्या पत्रानुसार विल्सन कॉलेज जिमखान्यास नोटीस देण्यात आलेली होती. परंतू सदर शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२/०९/२००३ रोजीचे धोरण रद्द केले. त्यामुळे त्यावेळी मुदवाढ देता आली नाही.

(४) जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेला जिमखाना या प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने जमीन वाटप करित असताना जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयात अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पीएच डी. संशोधक विद्यार्थ्यांसाठी फेलोशिप देण्याची जाहिरात नियमितपणे प्रसिध्द करण्याबाबत

**(२४) * २५७२० श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दलित-बहुजन समाजातील पीएच डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील ४ ते ५ वर्षापासून फेलोशिपच्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएच डी.संशोधक विद्यार्थ्यांसाठी समान धोरण रद्द करुन विद्यार्थ्यांच्या हिताचे न्यायपूर्ण धोरण राबविण्याची मागणी समर्थन संस्थेने मा.मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महासंचालक, डॉ.बाबासाहेब संशोधन आणि प्रशिक्षण व मानव विकास संस्था यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर भागातील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथी व महाज्योती इत्यादी संस्थेच्या पी.एच.डी. फेलोशिप जाहिरात नियमित प्रसिध्द करण्यासाठी व इतर काही मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन- २०२२ पर्यंत स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे. सन-२०२२ मध्ये बार्टी (विद्यार्थी संख्या ७६३), सारथी (विद्यार्थी संख्या १३२९), महाज्योती (विद्यार्थी संख्या १४५३ अशा एकूण ३५४५ संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरीता सन २०२३ व सन २०२४ या वर्षाच्या अधिछात्रवृत्ती योजनेची जाहिरात प्रसिध्द करावयाची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत सर्वंकष धोरणातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा व सदर स्वायत्त संस्थांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्य सचिव

महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करून अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तयार करावेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक प्रगती अहवाल तपासून उर्वरीत अनुदान वितरीत करण्याच्या प्रक्रियेचा समावेश करून त्यानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसांत सादर करावा, अशा उच्च व तंत्र शिक्षण विभागास सूचना देण्यात आल्या होत्या.

तसेच, यापुर्वी टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरीता विद्यार्थ्यांमार्फत करण्यात येणाऱ्या आंदोलनाच्या अनुषंगाने मा.उप मुख्यमंत्री [नगर विकास, गृहनिर्माण व सा.बां. (सा.ऊ.)] महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

यानुषंगाने या विभागामार्फत टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष व नियमावलीसंबंधी पुढील उचित कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागास विनंती करण्यात आली होती. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून त्यांचा अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रब्बी हंगामात खत व कीटकनाशकांच्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्याबाबत

**(२५) * २४१६० श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रब्बी हंगाम सन २०२४-२०२५ दरम्यान खत, बियाणे, कीटकनाशके, तणनाशके व औषधांच्या किंमतीत ३० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादन खर्च वाढूनही शेतमालाला हमीभाव किंवा बाजारभाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून अनेक शेतकरी कर्जबाजारी होत असल्याने शासनाच्या कृषी अनुदान, पीक विमा व सहाय्यक योजनांचा अपेक्षित लाभ न मिळता अप्रत्यक्षपणे निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खत, कीटकनाशक व तणनाशकांच्या दरवाढीवर प्रभावी नियंत्रण नसल्यामुळे कृत्रिम टंचाई, साठेबाजी किंवा अनधिकृत दरवाढ होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तसेच यामुळे शेतकऱ्यांना महागड्या निविष्ठा खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने खत-कीटकनाशकांच्या दरवाढीवर नियंत्रण ठेवणे, उत्पादन खर्च कमी करणे तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) राज्यात युरीया व डीएपी खतांचा प्रामुख्याने वापर केला जातो. त्यांच्या किंमतीमध्ये वाढ झालेली नाही. परंतू एसएसपी, MOP & NPK - १०:२६:२६, १२:३२:१६, १५:१५:१५ व १९:१९:१९, इत्यादी खतांच्या किंमतीमध्ये किंचित वाढ झाली आहे. गहू व हरभऱ्याच्या बियाणे व्यतिरिक्त इतर बियाणेच्या किंमतीमध्ये वाढ झालेली नाही व जैविक किटकनाशकांच्या किंमतीमध्ये वाढ झालेली नसून रासायनिक किटकनाशकांच्या किंमतीमध्ये अल्प प्रमाणात वाढ झाली आहे.

खतांच्या किंमती कमी होण्यासाठी रासायनिक खतांवरील जीएसटी रद्द करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनास पाठविला आहे. सन २०२५ पासून केंद्र शासनाने खतांवरील जीएसटी १२% वरुन ५% करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) व (४) नाही.

राज्यात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठांच्या उपलब्धतेसाठी ४८३ निरीक्षकांची नेमणुक करण्यात आली असुन सदर निरीक्षकांमार्फत शेतकऱ्यांना कृत्रिम टंचाई, साठेबाजीने खत विक्री होणार नाही या बाबत नियमित निविष्ठांची व दुकानांची तपासणी करण्यात येते.

अप्रमाणित/बोगस खते/किटकनाशके यांची विक्री होऊ नये यासाठी विभागाकडून संपुर्ण खबरदारी घेण्यात येत असुन तसे आढळल्यास त्यांचेविरुद्ध खत नियंत्रण आदेश, १९८५, अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ व किटकनाशके कायदा १९६८ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते. खते व किटकनाशके यावरील लिंकींग बंद करण्यासाठी उत्पादक कंपन्या व विक्रेते यांना लिंकींग न करणे बाबत वेळोवेळी सक्त सुचना दिलेल्या आहेत. तसेच लिंकींग न करणे बाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते.

राज्यामध्ये ४९७३५ खत विक्रेते व ७३२ खत उत्पादक तसेच ३९४५० किटकनाशके विक्रेते व १४९ किटकनाशके उत्पादक यांची गुण नियंत्रण निरीक्षकांमार्फत तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी १२४० खतांचे नमुने अप्रमाणित आढळले आहेत. त्यावर कायदेशीर कारवाई सुरु आहे. खताचा रु. ४०७.५६ लाख रक्कमेचा एकुण २३१९.५१ मे.टन साठा जप्त करण्यात आला आहे. राज्यात खत विक्रेत्यांचे एकुण ९२६ परवाने निलंबीत व ५३१ परवाने रद्द केले आहेत तसेच राज्यामध्ये ६३ पोलिस केसेस दाखल करण्यात आले आहेत.

राज्यात किटकनाशकांचे १५९ नमुने अप्रमाणित आढळले असून त्यांचेवर कायदेशीर कारवाई सुरु आहे. अप्रमाणित किटकनाशकांचा रु.१२० लाख रक्कमेचा एकुण २.५९ मे.टन साठा जप्त करण्यात आला आहे. राज्यात किटकनाशक विक्रेत्यांचे एकुण १९९ परवाने निलंबीत व १३८ परवाने रद्द करण्यात आले आहेत व १६ पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी उत्पादक संस्थांचा (FPO) कारभार सक्षम करून त्यांची आर्थिक क्षमता वाढविण्याबाबत

**(२६) * २४७४३ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अब्दुल सत्तार**

**(सिल्लोड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकरी उत्पादक संस्थांची (FPO) संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असूनही अनेक एफपीओ आर्थिकदृष्ट्या सक्षम नसून त्यांचा कारभार सुरळीतपणे चालत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शेतकरी उत्पादक संस्थांसाठी (एफपीओ) विविध योजना राबवून आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले जात असतानाही सन २०२४ पर्यंत नोंदणीकृत सुमारे चार हजार एफपीओपैकी केवळ २५ टक्के संस्था व्यावसायिकदृष्ट्या सक्रिय असून बहुतांश एफपीओंचा कारभार संथपणे सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुरी पायाभूत सुविधा, शासकीय आर्थिक पाठबळाचा अभाव कार्यकारी व्यवस्थापनातील अडचणी, प्रक्रिया उद्योग व बाजारपेठेपर्यंत पोहोच नसणे, साठवणूक तसेच वाहतूक व विक्री व्यवस्थेतील मर्यादा यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एफपीओंचा कारभार सुधारण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) यांच्या पुढाकारातून महाराष्ट्र राज्य एफपीओ धोरण २०२६-२०३१ तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अनेक एफपीओंचा कारभार बंद पडण्याच्या किंवा निष्क्रिय होण्याच्या स्थितीत असल्याने शासनाच्या विविध योजनांतर्गत दिलेला निधी, प्रशिक्षण व सहायाचा अपेक्षित परिणाम साधलेला नाही परिणामी शासकीय संसाधनांचा प्रभावी वापर न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील संथ व निष्क्रिय एफपीओंना कार्यक्षम व व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच एफपीओंना दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी ‘मित्रा’ उपक्रमांतर्गत नव्या धोरणात आवश्यक सुधारणा करून स्वतंत्र, कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही, असे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे. आर्थिक सल्लागार परिषदेच्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक संस्था (FPO) सक्षम करण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था धोरण २०२६-२०३१ तयार करण्यासाठी मित्रा कृषि विभागास सहाय्य करीत आहे.

(५) हे खरे नाही.

(६) अंशत: खरे आहे. आर्थिक सल्लागार परिषदेच्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक संस्था (FPO) सक्षम करण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था धोरण २०२६-२०३१ तयार करण्यासाठी मित्रा कृषि विभागास सहाय्य करीत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खारबाव (ता.भिवंडी, जि.ठाणे ) येथील वीटभट्टी मालकाने एका आदिवासी मजुराला केलेली मारहाण

**(२७) * २३०७८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारबाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील एका वीटभट्टी मालकाने जव्हार तालुक्यातील आदिवासी मजुराला आगाऊ दिलेल्या पैशांच्या बदल्यात अमानुष मारहाण करून वेठबिगारी करण्यास भाग पाडल्याची घटना दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विटभट्टी मालकाने किरकोळ कारणावरून मजुराच्या डोक्यात वीट मारून जखमी केले आणि त्या अवस्थेतही जबरदस्तीने काम करण्यास भाग पाडले तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार पीडित आदिवासी मजुराला वैद्यकीय उपचार, आर्थिक मदत, संरक्षण व पुनर्वसन करून संबंधित वीटभट्टी मालकावर कठोर कारवाई करण्यासह भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची होणारी पुनरावृत्ती टाळण्यासाठी विटभट्ट्यांवरील आदिवासी व स्थलांतरित मजुरांच्या संरक्षणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) भिवंडी तालुका पोलीस स्टेशन येथील दाखल गु.रजि.नं. ००२४/२०२६ नुसार या कार्यालयाचे अधिनस्त मंडळ अधिकारी खारबाव यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून वेठबिगार १) श्री. जितेश सिताराम डंबाळी, वय २५ वर्षे व २) श्रीमती फुलवंती जितेश डंबाळी, वय १९ वर्षे दोघे रा.सावरपाडा, ता.जव्हार, जि. पालघर यांना दिनांक १२/०१/२०२६ रोजी मुक्तता प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

तसेच, या कामगारांना Central Sector Scheme For Rehabilitation of Bonded Labour २०१६ च्या नवीन अधिसुचनेनुसार पुनर्वसनाकरीता तात्काळ मदत म्हणून प्रत्येकी रक्कम रुपये ३०,०००/- प्रमाणे ०२ वेठबिगारांसाठी रक्कम रुपये ६०,०००/- जिल्हा वेठबिगार पुनर्वसन निधी मधून उपलब्ध करुन देणेबाबत मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडूज (ता.खटाव, जि.सातारा) येथील बनावट रासायनिक खते आणि कीटकनाशके तयार करणाऱ्या कारखान्यांबाबत

**(२८) * २३२१९ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडूज (ता.खटाव, जि.सातारा) येथे सातारा कृषी विभाग आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने कारखान्यावर टाकलेल्या छाप्यात तीस लाख रुपयांहून अधिक किंमतीचे बनावट रासायनिक खत आणि कीटकनाशके जप्त केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी एका व्यक्तीने बनावट रासायनिक खते आणि कीटकनाशके तयार करून राज्यातील कृषी विक्रेत्यांना ही खते आणि कीटकनाशके विक्रीसाठी देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित व्यक्ती या कारखान्यातील बनावट खते व कीटकनाशके अनुदानित व विनाअनुदानित नामांकित कंपनीच्या बनावट छापील पिशव्यांद्वारे गावोगावी विकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यात बनावट रासायनिक खते आणि कीटकनाशके तयार करणाऱ्या संबंधितांवर तसेच कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) टाकळवाडे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, मौजे टाकळवाडे ता. फलटण जि.सातारा या कृषि सेवा केंद्रांच्या तपासणी दरम्यान अनुदानित संयुक्त रासायनिक खताची डि.ए.पी (१८:४६:०) खताची ५० किलो वजनाची ७२ पोती (३.६० मे. टन) व १०:२६:२६ या खताची ५० किलो वजनाची ४३ पोती (२.१५ मे. टन) आढळून आले. त्यांची नोंद E-pos मध्ये दिसून न आल्याने त्या जप्त करण्यात आल्या. सदर खतांचे नमूने अप्रमाणित आढळून आल्यामुळे संबंधीत टाकळवाडे वि.का.स.से. सोसायटीचे कर्मचारी व त्यांना खत पुरवठा करणारी कंपनी व गोदामाचे मालक यांचे विरुद्ध खत नियंत्रण आदेश १९८५ चे कलम १२, १३, १९, २१(अ), २२(ब), ३५ व अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३(२) (अ), ७ (२) (अ) (२) व भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३(५) नुसार गुन्हाची नोंद दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

तसेच कृषि विभागीय जिल्हास्तरीय भरारी पथक सातारा व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग सातारा यांनी संयुक्त पणे वडूज ता.खटाव, जि.सातारा येथील विठ्ठल नगर पेडगांव रोडवरील गोदामामध्ये छापा टाकला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर IFFCO व Paradeep Phosphate IPL कंपनीच्या १८:४६:०,१०:२६:२६ व MOP या खतांच्या हुबेहुब गोण्या छापुन घेऊन त्यामध्ये बोगस रासायनिक खत भरुन विक्री करत असल्याचे आढळून आले. या कारवाई मध्ये रु.२७.१८ लाख रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यानुसार सदर गोदाम मालकाविरुद्ध फलटण ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी पुढील कारवाई पोलीसांमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल येथील तत्कालिन प्रांताधिकारी यांनी विरार-अलिबाग कॉरिडॉरच्या भूसंपादनामध्ये केलेला आर्थिक गैरव्यवहार

**(२९)** * **२८५९६ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल येथील तत्कालिन प्रांताधिकारी श्री.राहुल मुंडके यांनी विरार-अलिबाग कॉरिडॉरच्या भूसंपादनामध्ये पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावातील ३५ हेक्टरहून अधिक जमिनीचा ५६ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रांताधिकारी यांच्याबाबत महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे त्यांच्या निलंबनासह विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर केला असून उक्त मंत्र्यांनी याबाबतचा प्रस्ताव पुन:श्च सादर करण्याचे निर्देश देऊन संबंधितांचे निलंबन न करता विभागीय चौकशी प्रस्तावित केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय सेवेत कार्यरत असताना संबंधित अधिकाऱ्याने शासनाच्या अनेक प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनी अल्प दराने नातेवाईकांच्या नावे खरेदी करुन कोट्यवधी रुपयांची संपत्ती जमा केली असल्यामुळे त्यांची उच्चस्तरीय चौकशी करुन कारवाई करण्याबाबत विविध सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रांताधिकारी यांनी पदाचा गैरवापर करुन त्यांचे कुटुंबिय शेतकरी नसताना देखील बनावट शेतकरी दाखला जोडून मौजे चेवणे (ता.कर्जत, जि.रायगड) येथील सर्वे नं.३/७ ही ३२ गुंठ्याची शेतजमीन त्यांचा भाऊ श्री. घनश्याम एकनाथ मुंडके यांच्या नांवे माहे जुलै, २०२५ मध्ये घेतली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विरार-अलिबाग या बहुउद्देशीय मार्गिकेसाठी मौजे कुंडेवहाळ, ता. पनवेल, जि. रायगड येथील स.नं. ३५/०, क्षेत्र ९-९९-० हे. आर पैकी २-९४-५० हे. आर या भूसंपादीत क्षेत्राबाबत मा. उच्च न्यायालयासमोरील रिट पिटिशन क्र.१२५०३/२०२४ मध्ये मा. न्यायालयाने सुरेंद्र पाल सिंग ब्राईट व इतर यांना अनुज्ञेय केलेला मोबदला रद्दबादल ठरवून पुढील कार्यवाही करण्याबाबत दिलेल्या निर्देशामध्ये श्री. राहुल मुंडके, तत्कालीन भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पनवेल यांच्याविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.
(२) व (३) मा. न्यायालयाच्या उक्त न्यायानिर्णयाविरुद्ध श्री. सुरेंद्रपाल सिंग ब्राईट व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयासमोर विशेष अनुमती याचिका (सिव्हिल) क्र.१४२०९/२०२५ दाखल केली. तसेच श्री. राहुल मुंडके यांनी दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका (सिव्हिल) डायरी क्र.२३४०१/२०२५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर प्रकरणातील मुळ याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेल्या निष्कर्षामुळे प्रभावित न होता चौकशी करण्यास दिनांक २६.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अनुमती दिलेली आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने मौजे कुंदेवहाळ येथील जमिनीबाबत मा. उच्च न्यायालयाकडील मुळ याचिकेमधील श्री. राहुल मुंडके यांच्या चौकशीव्यतिरिक्त उर्वरित आदेशास स्थगिती दिलेली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर विभागीय चौकशी सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव (परिशिष्ट १ ते ४) सह शासनास प्राप्त झाला असून विभागीय चौकशीची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील स.नं.३/७ क्षेत्र ० हे. ३२ आर ही शेतजमीन दस्त क्र.५१७२/२०२५, दिनांक २४/०७/२०२५ अन्वये श्री. घनश्याम एकनाथ मुंडके यांनी खरेदी केल्याचे दिसुन येते तसेच सदर दस्तासोबत जोडलेल्या मौजे चवरछा, तहसील-आहोर, जिल्हा जालोर, (राजस्थान) येथील खाता क्र.७२८ व खसरा क्र.८९८ वर श्री. घनश्याम एकनाथ मुंडके यांचे नाव असल्यचे दिसुन येते. सदर कागदपत्रांच्याआधारे उक्त खरेदीबाबत फेरफार क्र.११८२, दिनांक १४/११/२०२५ रोजी मंडळ अधिकारी कळंब यांचेकडून प्रमाणित करण्यात आलेला आहे.

-----------------

## दहेन्द्री (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील ग्रामपंचायतीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला अपहार

**(३०) * २५७७७ श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहेन्द्री (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत ग्रामपंचायतीत सन २०२३ या वर्षांच्या जुन्याच विहीरी दाखवून शासनाची दिशाभूल करून निधीचा अपहार केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना अशा दोन योजनांतून काही लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याने कृषि विभागामार्फत स्वतंत्र चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत नियोजन (रोहयो) विभागाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अपहारात सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय. सदर प्रकरणी गट विकास अधिकारी यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे.

(४) सदर चौकशी अहवालास अनुसरुन, संबंधित ग्राम पंचायत अधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे व दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांस कामावरुन कमी करण्यात आले आहे व संबंधित ग्राम रोजगार सहायकांना सेवेतून कमी करण्याबाबत ग्रामसभेला शिफारस करण्यात आली आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रासायनिक खतांचा वापर कमी करुन नॅनो युरियाचा वापर अनिवार्य करण्याबाबत

**(३१) * २४१६१ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या सर्वेक्षणानुसार युरियाच्या अतिवापरामुळे पिण्याच्या पाण्यातील नायट्रेटचे प्रमाण ६० ते ८० मिलीग्राम प्रति लिटरपर्यंत पोहोचले असून यामुळे आरोग्याच्या व प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायट्रेटयुक्त दूषित पाण्यामुळे लहान मुलांमध्ये ‘ब्लू बेबी सिंड्रोम’ आणि नागरिकांमध्ये पोटाचा कर्करोग होण्याचा धोका निर्माण झाला असून यामुळे आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून नैसर्गिक शेती आणि नॅनो युरियाच्या वापरासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असतानाही युरियाचा वापर कमी न झाल्याने शासकीय निधीचा विनियोग योग्य पद्धतीने होत नसल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने राज्यात रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी तसेच युरिया खताचा अतिवापर टाळून नॅनो युरियाचा वापर अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी माहे डिसेंबर मध्ये नायट्रेट बाधीत नमून्यांच्या स्त्रोत्राची माहिति कृषि आयुक्तालयास सादर केली होती. परंतु नायट्रेटचे प्रमाण रासायनिक खतांच्या वापरामुळे वाढले आहे हे स्वयंस्पष्ट झालेले नाही. युरिया लेपित असल्याने (Neam Coated) या खताचे झिरपण्याचे प्रमाण (Leaching Causes) कमी आहे.
(२) याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून तपासणी करण्यात येत आहे.
(३), (४) व (५) नॅनो खतांचे वापरासाठी कोणतीही अनुदानित योजना नाही. परंतू नॅनो युरियाचा प्रचाार होण्यासाठी सन २०२४-२५मध्ये राज्य पुरस्कृत एकात्मीक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनंतर्गत १९,२४,८३१ नॅनो युरीया बॉटलचा पुरवठा करण्यात आला होता.

सन २०२५-२६मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अन्नधान्य पिके व वाणिज्यक पिके या योजनेत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार नॅनो खतांचा प्रात्यक्षिकात कृषी विद्यापीठे व तत्सम संस्थांच्या मान्यतेने एक घटक म्हणून वापर करण्यात येतो.

राज्य स्तरावरुन नॅनो खतांना चालना मिळावी यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येते.

नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्सान देण्यासाठी राज्यात केंद्र पुरसकृत परंपरागत कृषी विकास योजना आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०%) तसेच डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन (राज्य हिस्सा १००%) राबविण्यात येत आहे. तीनही योजनांमध्ये मिळून एकूण ७,७८६ गटातील ३.२२ लाख हेक्टर क्षेत्रावरील ४.२५लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.